# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक ५ | मुंबई | नोव्हेंबर २०१४ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## 'अंतरीच्या वेदनांना..'

—सुहासिनी कीर्तिकर

त्रेसष्ट साल असेल; मी तेव्हा ज्युनियर बी. ए.च्या वर्गात होते. म. वा. धोंड आधीच बदलून गेले होते. पण विजया राजाध्यक्ष होत्या. आवडीनं मी मराठी विषय पदवीकरिता घेतला. पण काय? विजयाबाईही बदली होऊन एलफिन्स्टन कॉलेजला गेल्या. त्यांचं म्हणजे वर्गाबाहेर कॉलेजच्या बागेत आमचे वर्ग घेणं, कवितात रमणं. जुन्या जाणत्या वामन मल्हारांसारख्या कादंबरीकारांची नव्या जाणीवांनी टर उडवणं आणि 'व्याकरण बिकरण मला आवडत नाही हं, मी आपली पुस्तकातलं वाचून शिकवणार' म्हणणं... आमच्या तरुणाईला खूप खूप आवडायचं, जवळचं वाटायचं. त्यांची बदली झाली म्हणून आम्ही सहाजिकच खूपच नाराज होतो. या पार्श्वभूमीवर त्यांच्या जागी अमरावतीहून बदलून आले एक सर. ते म्हणे; सरोजिनी शेंडे यांच्या बाळंतपणाच्या रजेत पहिल्यांदा शिकविण्यासाठी रुजू झाले होते. मग बदलून अमरावतीला वगैरे गेले होते. आमच्या तरुणाईनं त्यांचं स्वागत सहाजिकच निषेधानं केलं. जवळजवळ सलग पंधरा दिवस आम्ही त्यांच्या कोणत्याच वर्गांना बसलो नाही. आम्ही म्हणजे कोण? तर मराठी विषय घेतलेल्या खुळ्या तीन मुली आणि एक खूप वर्षांच्या अंतरानं पुन्हा विद्यार्थी झालेले गृहस्थ! त्या काळात सरांनी आमच्या ट्युटोरिअलच्या वह्या बारकाईनं पाहिल्या. अभ्यासल्या. मग एक दिवस वाङ्मय मंडळाच्या बोर्डवर त्यातल्या त्यांना आवडलेल्या लिखाणावर एक छाऽऽन लेख झळकला. खाली सही होती... शंकर वैद्य! सुरेख अक्षर, सुरेख मनात भरणारी सही अन् खूप सुरेख आमच्याच ट्युटोरिअलच्या लिखाणावर (काही साहित्यविषयाच्या निबंधावर.. म्हणजे उदा:- 'साहित्याचे प्रयोजन' वगैरे.) खूप सुरेख अभिप्राय. आम्हाला ते सारं आवडूनच गेलं. मग काय? दुसऱ्या दिवशी आम्ही मुकाट त्यांच्या वर्गाला हजर! पातळ जिवणी जऽऽरा विलग करून, हातातली तपकिरीची डबी हलकेच ठोकत त्यांनी आम्हा प्रत्येकाकडे शोधक हसऱ्या नजरेनं पाहिलं. मी तेव्हा उगाच वेगळेपण म्हणून वहीच्या पहिल्या पानावर उजव्या हाताला, पण खालच्या कोपऱ्यात (सर्वजण वरच्या कोपऱ्यात लिहितात) माझे नाव लिहीत असे. वर आणखी वेगळेपण म्हणून त्याखाली 'आसुद' अशी सही ठोकत असे! (आसुद म्हणजे रक्त... आणि हे 'आसुद' म्हणजे आगासकर सुहासिनी दत्तात्रय.) पहिल्याच वर्गाच्या भेटीत त्यांनी त्याचं कौतुक केलं. मग काय? त्यापुढे आम्हा विद्यार्थ्यांचं आणि त्यांचं छाऽऽन जुळून गेलं. त्यांचं 'कैसे बोलणे, कैसे चालणे' असं कौतुक सुरू झालं. विशेष म्हणजे राजाध्यक्षबाईंनी वा.मं.च्या कादंबऱ्यांची उडवलेली टर त्यांनी पुसून काढली. म्हणाले, ''परीक्षार्थी म्हणून त्यांचे सगळे गुणविशेष सांगता आले पाहिजेत. अगदी शेवटी त्यांचे आजच्या दृष्टीतून दोष. तुम्हाला गुण मिळवायचे आहेत. तेव्हा लेखकाकडे पाहताना तटस्थ राहायला हवे. त्याचा लेखनकाळ नजरेआड करून चालणार नाही. आज ज्ञानेश्वरीमधील प्रतिमासृष्टी आहे का? पण ती त्या काळाच्या संदर्भात समजून घ्यायला हवी. ताजमहालला थडगं म्हणून चालणार नाही.. असलं तरी! ते चिरंतन प्रेमाचं प्रतिक म्हणूनच पाहता यायला हवं''... असे आमचे सर, शंकर वैद्य!अक्षर चांगलं व्हायला त्यांनी आम्हाला मनगटाचा व्यायामही शिकवला. पेपर पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत एकाच सुबक सुंदर अक्षरात लिहायला हवा; याचं भान दिलं. पु. ग. सहस्त्रबुद्धे हे त्यांचे त्यांच्या काळातले शिक्षक. वर्गात त्यांचा पेपर या अक्षरासाठी सहस्त्रबुद्धेसरांनी कौतुक करून दाखविला होता! सर शिस्तबद्ध होते,

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## का रे अबोला!

—मिनाक्षी जयकर

पाठारे प्रभु म्हटले की उत्सवप्रिय लोक डोळ्यासमोर उभे राहतात. आप्तस्वकीयांबरोबर एकत्र जमून मौज-मजा करण्याकरता त्यांना कुठलेही निमित्त पुरते. मग ते मोठ्या चिंबोऱ्या मिळाल्याचं असो की एखाद्या चिमुरड्याला के. जी.त प्रवेश मिळाल्याचे असो. निमित्त कितीही छोटे-मोठे असले तरी हे परभू एकत्र जमून साजरे करणारच! त्यातून दिवाळीसारखा मोठा सण असेल तर त्याची बातच काही और असते! तो तर आपण आठविंद्यापासूनच साजरा करायला सुरुवात करतो. म्हणजे नरकचतुर्दशीच्या साधारण आठवडाभर आधीपासून! पण यंदा 'प्रभुतरुण'ची दिवाळी त्याच्याही चार दिवस आधी सुरू झाली.

यावर्षी 'प्रभुतरुण'चा ९१वा वर्धापनदिन होता. हा सोहळा खारच्या प्रभुनगरीच्या हॉलमध्ये १२ ऑक्टोबरच्या रविवारी सकाळी संपन्न झाला. म्हणजे आठविद्याच्या आधीचा रविवार. म्हणूनच म्हटलं की 'प्रभुतरुण'ची दिवाळी लवकर सुरू झाली. या सोहळ्यासाठी सौ. पूजा अजिंक्य प्रमुख पाहुण्या लाभल्या होत्या. त्यांच्या हस्ते कै. विहंग नायक यांच्या फोटोस आणि श्री. विनोद प्रधान यांच्या हस्ते कै. सुहास कोठारे यांच्या फोटोना हार अर्पण करून या सोहळ्याची सुरुवात झाली. सर्वप्रथम 'प्रभुतरुण'च्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी सौ. पूजा यांना 'प्रभुतरुण दिवाळी अंका'चे प्रकाशन करण्याची विनंती केली. सौ. पूजा यांनी दिवाळी अंकाचे प्रकाशन झाल्याचे घोषित केल्यानंतर प्रा. सुहासिनी कीर्तिकरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, कदाचित् सर्व दिवाळी अंकांमध्ये प्रथम प्रकाशित होण्याचा मान प्रभुतरुणाच्या दिवाळी अंकाचा असावा. हा अंक दिमाखदार, संग्राह्य करण्यासाठी आजच्या तरुणाईने घेतलेल्या मेहनतीला त्यांनी दाद दिली. ज्ञातीयांची कला आणि त्यांना मिळणारे प्रोत्साहन यांची जाहिरात करणारा, अपवादात्मक एखादी व्यावसायिक जाहिरात सोडल्यास जाहिरातीशिवायचा हा अंक आहे असेही त्या म्हणाल्या. यानंतर प्रमुख पाहुण्या सौ. पूजा यांचा परिचय सौ. मिहिका मिथिल नवलकर यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचे श्री. विनोद प्रधान यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन तसेच प्रा. सुहासिनी कीर्तिकरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. कार्यकारी सह-संपादिका सौ. संजना कोठारे यांनी नवीन बदलांची रूपरेषा यावेळी स्पष्ट केली. प्रभुतरुणाच्या वाटाचालीत बऱ्याच जणांचा वाटा आहे. पण त्या सगळ्यांची नावं समोर येतातच असे नाही. याचा उल्लेख करून त्या म्हणाल्या की, जान्हवी कीर्तिकर, मिथिल नवलकर, मिहिका नवलकर, ज्ञानदा सुनिल पवार, मोहनीश शेट्ये, डॉ. शिल्पा जयकर, परज धुरंधर, कश्मिरा व्यवहारकर असे आठजण आणि दोन चार्टर्ड अकाउंटन्टस् अशी दहा जणांची टीम 'तरुणा'च्या वाटचालीत सहभागी होईल. तीन नवीन कार्यकारी सह-संपादक सौ. त्वरिता दळवी, सौ. भक्ती प्रधान-शेटये, श्री. राजेश नवलकर हे जानेवारी २०१५ पासून कार्यभार स्वीकारतील. नवीन सहसंपादकांच्या वतीने सौ. त्वरिता यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आतापर्यंत स्वत:ला हवं तसं आणि हवं तेव्हा लिहीत होते. आता आम्ही सर्व वाचकांच्या अपेक्षांना उतरू अशी आशा त्यांनी व्यक्त केली. नवीन टीमच्या वतीने श्री. मिथिल नवलकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यानंतर कु. अंजोर परेश कोठारे हिचा दहावीला ९४ टक्के गुण मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच ती युवामंचमध्ये दरमहा एक सदर सुरू करेल असे घोषित केले गेले. कु. अभिजीत भूषण प्रधान याने स्क्रॅबलच्या स्पर्धांमध्ये मिळविलेल्या

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

सर रसिक होते, आतली सुंदरतेची जाणीव राखून होते अन् सतत अस्वस्थही होते या संदर्भात. त्यांच्या या सगळ्या असण्याचा, शिक्षक-गुणाचा माझ्या सुदैवाने मला त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत लाभ झाला. ते कवी होतेच, कथालेखकही होतेच, समीक्षकही होतेच; पण आधार वाटावा ज्याचा; असे 'माणूस' होते. मी याच व्यवसायात आल्यावर काही काळ त्यांची सहकारीही होते. त्याआधी दोन वर्षे 'फेलो' होते. मी काय अन् कसं शिकवते यावर त्यांचे अगदी आजपर्यंत (शेवटपर्यंत) लक्ष होते. ते गेले त्याच्या चार दिवस आधीही त्यांचा मला फोन आला होता. खूप गप्पा व्हायच्या; तशा त्यावेळीही झाल्या. माझं लेखन, माझा व्यवसाय, माझं काम, माझा संसार... हे सगळं एक वडीलधारे माणूस म्हणून त्यांच्या 'जगण्याचा' जणू भाग होते. मला आठवतंय्, माझ्या यजमानांना जीवघेणं दुखणं झालं, तेव्हा वैद्यसर न चुकता मला एक दिवसाआड फोन करीत. इतर गप्पा मारून संवाद साधीत. आपल्या आईविषयी बोलत. स्वतःच्या काही घरगुती वाटाव्यात अशा चिता सांगत... हेतू एकच. मी माझ्या नवऱ्याच्या दुखण्यात खंबीरपणे उभी रहावे. (म्हणूनच माझ्या आयुष्यात कोणतीही ठळक गोष्ट घडली की माझ्या वैद्यसरांना मी ती विश्वासाने सांगत असे.) किती किती आठवणी! मी हिरव्या चाफ्याची वेणी कॉलेजमध्ये माळत असे. तर एखादे फूल ते पुढच्या वेळी आणायला सांगत अन् सर्व वर्गात जाताना बुशशर्टच्या वरच्या खिशात ते वागवत. 'अंतरीच्या वेदनांना नाही किनारा' ही त्यांची कविता फारशी प्रसिद्ध नाही. पण ती सिद्ध झाली तेव्हा मी साक्षीदार होते. 'आई उभी' ही त्यांची गाजलेली कविता 'माझे सारे सुख तिच्या वाट्याला यावे' म्हणत उभी राहिली तेव्हाही त्यानंतर त्यांनी मला फोनवरून सांगितली. त्यांच्या जुन्या घरात; 'आफ्रिका हाऊस' मध्ये त्यांनी काढलेली चित्रे होती. स्वप्नांमधून साकारलेली, त्या स्वप्नांचा अर्थ आणि चित्रं यातला धागा मला कसा विणता येतो; त्यांनी ते अजमावून पाहिलं होतं. 'लावण्याच्या वेली' नावाचं कवितासग्रहणाचं सदर त्यांनी 'वसंत' मध्ये लिहिलं. ते स्वीकारावं की नाही, त्यात कोणकोणत्या कवितांचा समावेश असावा याविषयी ते माझ्याशी खूप बोलले होते. चर्चा केली होती. 'ल' हे अक्षर सागरगोटे खेळणारी फतकल मारलेली पोर कसे आहे हेही त्यांनी मला गंमतीनं सागितलं होतं. हे असं चित्रभान, प्रसंगभान, दुसऱ्याचं चांगलं पहाण्याचं भान, आनंदानं जगण्याचं भान त्यांना सदासर्वकाळ होतं.

त्यांच्या ऐंशी वयाचा सुंदर सोहळा दीनानाथमध्ये झाला होता. बाबासाहेब पुरंदऱ्यांनी 'माझ्या लग्नाची मंगलाष्टकं शंकरनं लिहिल्या'ची घटना तेव्हा सांगितली होती. पाडगावकरांच्या ऐंशी वयाचा सोहळा रवींद्रमध्ये झाला तेव्हा पाडगावकर म्हणाले, 'ही माझी अखेरची कवितेची वही.' वैद्यसर पटकन् म्हणाले, 'अखेरची कवितेची वही, क्रमांक एक.' डॉ. यशवंत पाठक, डॉ. तारा भवाळकर आणि अध्यक्ष शंकर वैद्य एका कार्यक्रमात होते. ते पटकन् म्हणाले, 'दोन डॉक्टरांच्या मध्ये एक वैद्य उभा आहे.'... हेच आनंदानं जगण्याचं भान ना?

सुंदर काळेभोर उलटे वळवलेले केस, धारदार नाक, गोरा वर्ण, पातळ जिवणी, आकर्षक कपड्याचं भान असे वैद्यसर शेवटपर्यंत तसेच राहिले. चिरतरुण. दिसण्यात, वागण्यात चिरतरुण! म्हणूनच शेवटच्या 'त्या' भेटीत पांढरे भाबरलेले केस, एका पायावर भलीमोठी सूज, स्मितहास्यरहित आडवे पडलेले कविवर्य, शिक्षक, माणूस वैद्यसर अगदी, अगदी म्हणून पहावले नाहीत. मलाही नाहीत. कुणालाच नाहीत. त्यांच्या निरंजनचे पोरकेपण तर आम्हालाच पोरके झाल्यासारखे वाटत असताना आम्ही कसे सावरणार होतो? जो धीर सरांनी मला वेळोवेळी दिला, सौंदर्यशास्त्राचे खास धडे दिले, जगण्याचा सुंदर महाल बांधून दिला तो धीर, ते भान निरंजनला आम्ही कसे देणार होतो? हां, एक खरंच की 'शंकर'मधील 'शक्कर' (त्यांच्याच एका कवितेतली ही करामत!) मात्र आठवणीत तशीच राहील!

## पाठारे प्रभु महिला समाज शतक महोत्सव

महिला समाजाचा १०० वा स्थापना दिन रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०१४ रोजी दुपारी ४.३० वाजता रविंद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे सौ. स्मृति व श्री शीतल तळपदे प्रस्तुत 'शताब्दी एक्सप्रेस' हा सांस्कृतिक कार्यक्रमाने साजरा झाला.

प्रवेशद्वारी 'संस्कार भारतीची' रांगोळी काढली होती, सनईचे सूर वातावरणात घुमत होते. कार्यकर्त्यांनी लावलेल्या अत्तराने व तोंड गोड करणाऱ्या पेढ्याने प्रेक्षकांचे स्वागत झाले.

अभिनेत्री सीमा रमेश देव यांनी दीप प्रज्ज्वलन करून सोहळा सुरू केला.

सौ. सीमा देव यांना भरजरी शेला, नारळ, ट्रॉफी व सौ. बिंबा नायक यांनी बनविलेला चॉकलेटचा बुके भेट दिला.

त्यांच्या हस्ते शतक महोत्सवाप्रीत्यर्थ पाठारे प्रभु महिला समाजाच्या स्मरणिकेचे उद्घाटन करण्यात आले.

ठीक ५ वाजता पडदा उघडला गेला व कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम नांदीनृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर नाट्यसंगीत, रंग माझा वेगळा या शीर्षकरूपाने ठुमरी, लावणी व मेडली नृत्य सादर करण्यात आले,

(पान १ कॉलम ४ वरून)

यशाचा उल्लेख केला गेला. श्रीमती प्रमिला तळपदे यांनी वर्धापनदिन साजरा करण्यासाठी दिलेल्या देणगीबद्दल सौ. पूजा यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. तसेच श्री. विनोद प्रधान यांचा वर्गणीदारांची सूची अद्ययावत केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

सौ. पूजा यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले की, 'मला मल्टीटॅलेन्टेड वगैरे म्हटलं. पण यासाठीचा प्लॅटफॉर्म किंवा बेस 'प्रभुतरुण'ने दिला. चेहऱ्यावर हसू असेल तर कोण म्हातारं होईल? आम्ही कायम तरुणच राहणार!'

यानंतर दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सौ. वृंदा जयकरांनी आणलेला केक तसेच प्रभुतरुण टीमने आणलेला मोठ्ठा केक जुन्या-नव्या टीमसह सर्वांनी मिळून कापला. डॉ. विनोद धुरंधरांकडचे दरवर्षीप्रमाणे यंदाही आलेले लाडू सर्वांना वाटले. यानंतर श्री. सुबोध प्रधान, श्री. प्रताप वेलकर, श्री. परेश कोठारे, श्री. रंजन विजयकर यांनी प्रेक्षक-वाचकांच्यावतीने आपले मनोगत मांडले, श्री. मोहनीष शेट्ये यांनी देणगीवाचन केले. श्री. अजित विजयकर पा. प्र. चॅरिटीजचा कार्यक्रम असल्याने स्वतः उपस्थित राहू शकले नाहीत. पण न चुकता देणगी पाठवून या कार्यक्रमात त्यांनी आपले योगदान दिले.

श्री. गुंजारव नायक यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर स्वादिष्ट भोजनाने या सोहळ्याची सांगता झाली.

म्हणता म्हणता दिवाळी सरली. सुकडी फस्त झाली. तरी या कार्यक्रमाच्या आठवणीची चव अजून जीभेवर रेंगाळते आहे...! मंगेश पाडगावकरांची एक कविता आठवून नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह तुमची रजा घेते- ''आनंदानं हसलात तर तरुण असतं म्हातारपण...''

*

कवयित्री संमेलन झाले. कवयित्री संमेलनात ऐंशी वर्षांवरील, साठीपुढची, तरुणी आणि बालिका अशा चार पिढ्या सहभागी होत्या. त्याचे संचालन प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी केले. फॅशन शो झाला. त्यात जिजाबाईंच्या काळापासून ते मॉडर्न मुलींपर्यंतची वेशभूषा कशी बदलत गेली ते दाखविण्यात आले.

मध्यंतरानंतर एन्टरटेनमेंट नाव असलेल्या नाटकाने बहार आणली. प्रेक्षकांनी नाटकाला मनमुराद दाद दिली.

'सण आला भाग्याचा' ही १२ सण असलेली नृत्यनाटिका सादर करण्यात आली. याचे दिग्दर्शन सौ. मयुरा नायक यांचे होते.

महिला समाजाच्या इतिहासाचे लेखन सौ. शिल्पा नवलकर देशपांडे ह्यांचे होते, तसेच सण आला भाग्याचा ह्या कार्यक्रमाचे लेखन श्रीमती स्वाती प्रवीण राणे यांचे होते. त्यांनी सूत्रसंचालनही बहारदार केले.

'वंदे मातरम्' ह्या नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली. ह्या सर्व कार्यक्रमात एकूण ८० कलाकारांनी भाग घेतला होता. पाच वाजता सुरू झालेला कार्यक्रम रात्री १० वाजता संपन्न झाला.

*

बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०१४ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाचा कौतुक समारंभ सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२ वा रस्ता (प.) खार येथे संध्याकाळी ७ वाजता साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व कलाकारांना व त्यांना मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांना पाठारे प्रभु महिला समाजातर्फे ट्रॉफी देण्यात आली.

सामीष भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

*

शनिवार दिनांक ४ ऑक्टोबर २०१४ रोजी दांडिया कार्यक्रम पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२ वा रस्ता खार (प.) येथे सौ. शोभा रंजन विजयकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

समाजाध्यक्ष सौ. वृंदा जयकर यांनी अध्यक्षांचा चॉकलेटचा बुके व भेटवस्तू देवून परिचय करून दिला व सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

श्रीमती प्रमिला तळपदे आयोजित व सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे दिग्दर्शित 'रास गरबा', ज्ञातीय भगिनींनी सादर केला. ह्यात भाग घेतलेल्या भगिनींना सौ. वृंदा जयकरांकडून भेटवस्तू देण्यात आली.

डिजेच्या तालावर सर्व ज्ञातीय बंधू भगिनींनी दांडियाचा आनंद घेतला.

शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर २०१४ रोजी सायंकाळी ४ वाजता समाजातर्फे गरजू भगिनींना दिवाळीनिमित्त लुगडी वाटप करण्यात आले. तसेच प्रभादेवी चॅरिटेबल ट्रस्टकडून आलेल्या देवीच्या साड्या व ब्लाऊज पीस देण्यात आले. सौ. माधुरी कीर्तिकर, सौ. वर्तिका कीर्तिकर, डॉ. सौ. सुनंदा कीर्तिकर, श्रीमती यदुला तळपदे, सौ. योगिनी धैर्यवान, व सौ. लीना वाझकर ह्यांच्याकडून सुकडीसाठीचे साहित्य देण्यात आले. सौ. निशा राणे जाधवकडून कै. श्रीमती कुंदा आनंदराव अजिंक्य व कै. श्री. नंदलाल खंडेराव राणे स्मरणार्थ तसेच पाठारे प्रभु महिला समाजातर्फे शतक महोत्सवाप्रीत्यर्थ प्रत्येकी रु. १०००/- देण्यात आले.

*

हौशी कला मंदिर

दि. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी हौशी कला मंदिर संस्थेचे ६४वे दिवाळी संमेलन मोठ्या दिमाखात पार पडले. त्या दिवशी 'जस्ट हलकं फुलकं' नाटक सादर झाले.

संमेलनाचे अध्यक्षस्थान सौ. उर्वशी आनंद धराधर यांनी भूषविले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''पाठारे प्रभु जातीमध्ये लग्न करून आल्यावर दिवाळीचे सर्व दिवस कसे साजरे करायचे ते कळले.''

विशेष अतिथी श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांचा सत्कार केला गेला. तसेच श्रीमती वंदना प्रमोद

(पान ३ कॉलम ४ वर)

लेखांक ११

# माणूस म्हणून- वैतागवाडी

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

''हमरस्त्याच्या बाजूला घर असावं. संध्याकाळी कोणाची वाट पाहत उभं राहिलं तरी वाटत असलेली काळजी पण विसरायला होईल असं काय-काय दिसत राहतं. नव्या फॅशनचे कपडे, गाड्यांची नवी मॉडेल्स, मोटरबाईक्सचे नवे रंग, चपला-बुटांचे विविध प्रकार आणि वाहतुकीची कोंडी सोडवायचे नव-नवीन उपाय'' शुभदा वीरेन्द्रला सांगत होती.

''बाकी सगळं कळलं गं. पण वाहतुकीची कोंडी सोडवायचे नव-नवीन उपाय तू वर गॅलरीत उभी राहून कसे सुचवणार ते सांग बघू.'' वीरेन्द्रला प्रश्न पडला.

''अरे, तो बिचारा ट्रॅफिक पोलीस उभे आडवे हात करत, फू-फू शिट्या वाजवत नाचत असतो इथे-तिथे. पण कोंडीचा तिढा काही सुटत नाही. पण मी वरून पाहत असल्यामुळे मला समजत असतं की टॅक्सीवाल्याने यू-टर्न मारण्यासाठी घुसवलेली टॅक्सी थोडी पाठी घेतली, दोन वाहनांच्या फटींतून घुसवत-घुसवत पुढे नेलेल्या मोटरबाईक्स एका बाजूने जात राहिल्या आणि दुकानाच्या पुढ्यात माल उतरण्यासाठी उभी केलेली टेम्पो मार्गस्थ झाली तर वाहतुकीची कोंडी सुटल्यातच जमा आहे. तो ट्रॅफिक पोलीस जर आत्ता इथे वर गॅलेरीत येऊन इथून पाहील, तर लगेच समजेल त्याला नेमकं काय केलं पाहिजे ते'' वीरेन्द्र मनापासून हसला. गंभीर समस्यांवर आपली बायको इतके सोपे तोडगे कसे काय काढू शकते, असा प्रश्न त्याला नेहमीच पडतो.

रात्री शुभदा तिचं आवडतं टी.व्ही. सिरियल पाहत असताना मात्र या वाहतुकीच्या कोंडीमुळे अशी वैतागते. जितक्या गाड्या तितके हॉर्न पीं-पीं-पीं वाजत असतात. प्रत्येकाला घरी जायची घाई झालेली असते. प्रत्येकालाच वाटत असतं की मी हॉर्न वाजवीन तरच पुढची गाडी हलेल. मला वाट करून देईल, मग मीही हलेन आणि लवकर घरी पोहोचेन. खरं तर प्रत्येकाला ठाऊक असतं की पुढे-पुढे आणि त्याही पुढे ही गाड्यांची रांग अशीच खोळंबलेली आहे. त्यातच मधे टेम्पो, बस अशी मोठी वाहनं आहेत. 'चालत जाणं' अधिक लवकर पोहोचणारं आहे. पण मग हे वाहन, ज्यात आपण बसलोय, त्याचं काय? या गाड्यांच्या हॉर्नच्या आवाजात शुभदाला सिरियलमधलं संभाषण अजिबात समजत नाही, वीरेन्द्रची हाक ऐकू येत नाही, की कूकरची शिटी वाजलेलीही कानांपर्यंत पोहोचत नाही. तशातच मुसळधार पावसाचं थैमान सुरू झालं, तर पावसाच्या आवाजावर आवाज काढून रात्री अकरा वाजताही हे हॉर्न वाजतच राहतात.

''काय वैताग आहे.'' वीरेन्द्र परवा डब केलेला तमीळ चित्रपट पाहत होता. आणि हे हॉर्नचे आवाज त्याचा रसभंग करत होते. खरं तर हाणामाऱ्यांशिवाय असतं काय त्यात? संभाषणं कानांवर पोहोचली नाही तरी चालण्यासारखं असतं. पण वीरेन्द्र वैतागून गॅलरीत जाऊन ओरडला, ''बंद करो ये आवाज.'' घरातल्या घरात एकमेकांकडे न पोहोचणारे आवाज, पाचव्या मजल्यावरून खाली थोडेच ऐकू जाणार होते? मग शुभदा म्हणाली, ''रस्त्याच्या बाजूला असलेलं घर आवडतं ना तुला? मलाही आवडतं. पण ध्वनिप्रदूषण हा मोठ्ठा तोटा आहे. त्याचा. अत्यंत जरूरी असल्या-शिवाय हॉर्न वाजवायचा नाही असं प्रत्येकाने ठरवलं तरच काहीतरी मार्ग निघू शकतो. त्यातून पण गाडी रांगणाऱ्या बाळाच्या वेगाने चालवावी लागली की आतला चालक इतका वैतागत असेल की वैताग व्यक्त करायचं एकच साधन त्याच्यापाशी असतं तो हॉर्न! शिवाय आपल्या घराखाली चार रस्ते एकत्र येतात; कायमच वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे हे आपल्याला दररोज सहन करावं लागतं. या चालकांना भलाभक्कम दंड भरावा लागला तरच थांबेल हे.

''आधीच त्याचे हॉर्नचे आवाज. त्यातच तुझं हे भलं मोठं भाषण.'' वीरेन्द्रने टी.व्ही. चा आवाज मोठा करूनही पाहिला. पण छे! मग टी.व्ही. बंदच करून म्हणाला, ''चल, मी खाली जाऊन ब्रेड, नारळ - तुला आणखी काही हवं तर सांग, तेही घेऊन येतो.'' त्या हॉर्नच्या आवाजापुढे काय आणायचं होतं ते आठवेनाच शुभदाला. ''आठवलं तर कळव मला मोबाईलवर'', असं सांगून वीरेन्द्रला मग कोथिंबीरीची आठवण झाल्यावर शुभदाने फोनही केला, पण वीरेन्द्रला काही रिंग ऐकू आली नाही. नारळ, ब्रेड घेऊन तो आल्यावर त्याने वाजवलेली बेल शुभदालाही ऐकू आली नाही. कूकरच्या शिट्याही तेव्हाच वाजत होत्या. त्या थांबल्या तेव्हा कुठे बेल ऐकून शुभदाने दरवाजा उघडला. तोपर्यंत आधीच वैतागून गेलेल्या वीरेन्द्रची स्थिती, 'आधीच मर्कट, तशात मद्य प्याला' अशी झाली होती. ब्रेड आणि नारळाचं वजन ते कितीसं? पण हातातली पिशवी शुभदाच्या हातात न देता त्याने बाजूच्या खुर्चीत फेकली आणि धडामकन दरवाजा बंद केला. खिडकीच्या काचाही हादरल्या बिचाऱ्या.

''काय हे वीरेन्द्र? दार आपटून लॅचलॉक खराब होईल आणि पिशवीचा नेम चुकला तर नारळ फुटेल. ब्रेडची पिशवीही फुटेल. मग नारळाच्या पाण्यात बुडवून खा ब्रेड'' वीरेन्द्रला हसू आलं. पण ते पहायला शुभदा होती कुठे? कुकरची पुन्हा एक शिटी वाजली होती. घाईघाईने कूकर उतरवून मग तिने भाजीला फोडणी दिली. तेवढ्यात पुन्हा बेल वाजली. चिंटू आला होता. आल्या-आल्या कोपऱ्यात बॅट फेकून तो हात-पाय धुवायला गेला. तोंडाची बडबड चालूच होती. ''मला खोटा आऊट दिला. मी क्रीजमध्ये परत आलो होतो, तरी अंगद म्हणतो मी रनआऊट झालो. उद्यापासून खेळणारच नाही मी त्यांच्याबरोबर आजी, उद्या ते मला बोलवायला आले, तर सरळ सांगून टाक, की मी घरात नाहीये म्हणून.''

त्याच्यापाठून त्याला टॉवेल द्यायला गेलेली शुभदा म्हणाली, इतक्या रात्री काळोखात दिसलं नसेल अंगदला की तू क्रीजमध्ये आहेस. म्हणून काय बॅट फेकायची? अरे ती आपली बॅट आहे. तुटली तर, किंवा बॅटमुळे टाईल्स फुटल्या तर आपलंच नुकसान होणार ना?''

तेवढ्यात पाचव्या मजल्यावर लिफ्ट थांबली. धडाम्-लिफ्टचा दरवाजा आणि पाठोपाठ दरवाजाची बेल टणा-टणा-टणा. ''किती जोरात लिफ्टचा दरवाजा बंद केलात बाबा. तुटेल ना तो?'' चिंटूने आजीच्या वाटणीचं वाक्य फेकलं. ''आणि उशीर किती केलात आई-बाबा?''

''काय करणार? ट्रॅफिक जॅममध्ये अडकलो होतो. किती हॉर्न वाजवत होतो. पण पुढची गाडी हलत म्हणून नव्हती.''

''काय हॉर्न वाजवत होतास? अरे आजूबाजूच्या इमारतीतल्या लोकांचा विचार करायचा ना थोडा?''

''काही नाही रे. वाजवा हॉर्न. आमचा कोण करतंय विचार? मग आम्ही तरी का दुसऱ्यांचा?'' वीरेन्द्रचा वैताग बोलत होता. पुढे तो काय बोलला, ते कोणालाच ऐकू गेलं नाही. कारण स्वैंपाकघरात धडाम करून भांडी पडल्याचा आवाज आला. शुभदाच्या हातून भांडी पडली होती. पाडलीही असतील कदाचित. तिचं डोकंही असं फिरायला लागलं होतं की शक्यता नाकारता येत नाही तीही.

*

---

(पान २ कॉलम ४ वरून)

नवलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मध्यंतरामध्ये खास आमंत्रित नवनिर्वाचित आमदार ॲड आशिष शेलार यांनी कार्यक्रमास भेट दिली. त्यांचा श्री. प्रकाश बा. नायक यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच आमंत्रित उपमहापौर सौ. अलका केळकर यांचा डॉ. सौ. प्रिया धुरंधर यांनी शाल व गुच्छ देऊन सत्कार केला.

नाटकानंतर लकी डीपचा कार्यक्रम पार पडला. यावर्षी प्रथम पारितोषिक कार्बनचा टच् स्क्रीन मोबाईल हे होते.

कार्यक्रमानंतर नेहमीप्रमाणे बससेवा उपलब्ध होती.

---

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# अभिनंदन आणि शुभेच्छा!

## १०१ व्या वर्षात पदार्पण

श्रीमती सुमती शामराव त्रिलोकेकर, आपल्या ज्ञातीतील अशी एक व्यक्ती ज्यांनी दिनांक १ नोव्हेंबर २०१४ रोजी १०० वर्ष पूर्ण करून १०१ व्या वर्षात पदार्पण केले. त्यांच्या या यशस्वी कारकीर्दीसंबंधी थोडक्यात सांगू इच्छीते.

श्रीमती सुमती शामराव त्रिलोकेकर यांचा जन्म मुंबईच्याच कोलभाठ लेनच्या (आजची एम. व्ही. वेलकर स्ट्रीट) एका यथातथा कुटुंबातील. दोन मोठ्या बहिणींच्या पाठीवर शेंडेफळ असल्याने घरात लाडात वाढल्या. शालेय शिक्षण इ. १ ली ते ४ थी लॉर्ड हॅरीस शाळेत झाले. चारही वर्षे संगीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावण्याचा मान त्यांस मिळाला. संगीताची आवड बालपणापासून अंगी होती. मूळ संगीताचे बाळकडू आईवडिलांकडून मिळाले. पुढे गायन व संगीताची आवड ओळखून घरातल्या वडीलधाऱ्या माणसांनी काळे मास्तरांची नेमणूक पुढील संगीत शिक्षणासाठी केली.

दरम्यान पुढील शिक्षणासाठी कमळाबाई हायस्कूलमध्ये दाखल केले गेले. संगीताची ओढ आणि आवड तशीच होती. महाराष्ट्र संगीत विद्यालयात पुढील ३ वर्षे सतारीचे धडे घेतले. ह्या दरम्यान त्यांना रामचंद्र गोखले (म्हणजे पं. पलुस्करांचा भाचा) यांच्या योगे All India Radio (A.I.R.) वर orchestra मध्ये प्रथमच गाण्याची संधी मिळाली आणि इथूनच संगीताची आणि गायनाची जोरदार वाटचाल सुरू झाली. १९३५-३६ च्या दरम्यान त्यांनी एकेरी (solo) गायनही A.I.R. वर सादर केले. नारायणराव व्यास यांसारख्यांची शाब्बासकीची पाठीवर थाप मिळाली.

१९४७-४८ दरम्यान HMV चे संचालक, जोशींशी संपर्क आला. आणि त्यांनी गायलेली गाण्याची रेकॉर्ड बाजारात आली. श्रीमती सुमती शामराव त्रिलोकेकर यांचा प्रख्यात उद्योजक बिर्ला कुटुंबाशीही जवळून संबंध आला. घरात अनेक नोकरचाकरांची रेलचेल. परंतु, मुलांवर (कुमारमंगलम बिर्ला आणि वासवदत्ता बिर्ला) यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी आदित्य बिर्लांच्या मातोश्री, सरलाबाई बिर्ला यांनी सुमती त्रिलोकेकरांची निवड केली. सुमती त्रिलोकेकरांच्या देखरेखी खाली कुमारमंगलम बिर्ला आणि वासवदत्ता बिर्लाचे बालपण पूर्ण झाले. इथे सांगावेसे वाटते की आजही बिर्ला कुटुंब श्रीमती सुमती त्रिलोकेकरांच्या संपर्कात आहे.

अशी ही एक यशस्वी जीवनगाथा तुमच्या समोर मांडावयाचा प्रयत्न केला. त्यांच्या १०० व्या जन्मदिवसाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचाल आरोग्यदायी, सुखाची आणि समाधानाची जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-अनामिक**

*

## अभिनंदन



**Jaysheel Praful Pradhan**
Chief Technology Architect,
Ecselis, Havas Media
Age - 25

Some of the words Jaysheel uses to describe himself are sketch artist, engineer, linguist, hungry student, optimist, thinker and an ordinary fellow. Undaunted by challenges, he believes in the power of his dreams. Ideas and technolgy excite and drive him. He believes that creative tech can affect lives positively, 'I'm the guy who writes the code, the architect who builds the foundation and form, the artist who conceives and designs your experience,'' says Jaysheel. He fell in love with HTML in the final year of his college. He began at Havas Media as a client developer. In his free time, Jaysheel is passionate about gaming, soccer, table tennis, working out, watching movies and keeping up with the latest technology. Five years later, he sees himself heading a larger team and having his own hub of innovation.

RECENT WORK & ACHIEVEMENTS

Describing his work, Jaysheel states, ''Four years, 100 + project, 50 + clients, 1 million + lives touched.'' since 2013, Jaysheel has worked on over 25 client projects across Asia Pacific including LAN Airlines, Schick and Cathay Pacific.

''We hired Jaysheel as a complete rookie four years ago but he has worked so hard that he is an example of transformation. A technical good deep logician with sharpened skills and creativity, his attitude is amazing - smiling, responsive and energetic, Humble yet he drives people in high quality pressure. He is an asset to any organization.''

**-Rajeev Bala -**
MD - Asia pacific, Ecselis,
Havas Media.

*

## पत्र प्रतिक्रिया

मा. संपादिका,
प्रभुतरुण,
स. न. वि. वि.

प्रभु तरूणच्या वर्धापन दिन सोहळ्याला उपस्थित राहण्याचा योग आला. त्यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते ऐकताना माझ्या मनात गतस्मृतींना उजाळा मिळत गेला. कै. सुहास कोठारे यांनी प्रभुतरुणच्या संपादकपदाची धुरा सांभाळली. त्यावेळी त्यांनी मला प्रभुतरुणसाठी लिखाण करण्याकरिता आवर्जून बोलावले होते. चित्रकार रावबहादूर धुरंधर यांच्या चित्रांचे एक भव्य प्रदर्शन त्यांच्या कन्या अंबिका धुरंधर यांनी मुंबई विद्यापीठाच्या कॉन्व्होकेशन हॉलमध्ये भरवले होते. त्याचा वृत्तांत लिहिण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपवली होती. साल नक्की आठवत नाही, पण माझ्या विवाहापूर्वी म्हणजे १९७२ पूर्वी कधीतरी हे प्रदर्शन भरले होते. तो माझा प्रभुतरुणशी आलेला पहिला संपर्क! माझ्या लिखाणाविषयी कै. सुहास व कै. विहंग यांनी त्यावेळी मला शाबासकीची दादही दिली होती. काही क्षण, प्रसंग हे आपल्या आयुष्याला कलाटणी देणारे किंवा उत्तेजन देणारे ठरतात, तसाच हा प्रसंग होता. त्यानंतर मीही काही लिहू शकते हा आत्मविश्वास दुणावला.

नंतर प्रभुतरुणच्या 'पडघम' घडतानाच्या प्रक्रियेत मी व माझे पती कै. प्रवीण राणे यांचा बराच सहभाग होता. ''आला आला मेळा, प्रभुतरुणाचा मेळा, नाचू चला, गाऊ चला सकल मिळोनी चला'' अशी शब्दरचना असलेलं (आणि चालत आला, आला वारा, संगे पावसाच्या धारा') पडघमचं हे गीत आमच्या खारच्या घरी प्रथम स्फुरले. पार्ल्याच्या दीनानाथ नाट्यगृहात हा समारंभ झाल्याचे स्मरते. १९८७ साली मी व माझे पती कै. प्रवीण यांनी, आद्य मराठी संगीत नाटककार म्हणून ज्यांना मान मिळायला हवा होता, त्या कै. सोकर बापूजी त्रिलोकेकरांचं 'सं. नलदमयंती' हे नाटक २ डिसेंबर १९८७ रोजी दीनानाथमध्येच ४० कलाकारांच्या संचात सादर केलं होतं. त्रिलोकेकरांचं हे नाटक अण्णासाहेब किर्लोस्करांच्या सं. शाकुंतलापूर्वी १ वर्ष लिखित (छापील) स्वरूपात प्रसिद्ध केलेलं होतं आणि त्याचा १ प्रयोगही झालेला होता. मूळ ७ अंकी असलेलं हे नाटक मी त्याची ३ अंकी रंगावृत्ती तयार करून आणि प्रवीणनी त्यातील पदांना नव्याने चाली लावून (कारण मूळ चाली सांगणारी एकही व्यक्ती हयात नव्हती) सादर केले होते आणि त्यात कै. सुहास कोठारेंचे सुपुत्र श्री. दीपक कोठारे, शिल्पा नवलकर, पूजा अजिंक्य, स्मृती तळपदे, अमर अजिंक्य, शीतल तळपदे, या आज नावारूपाला आलेल्या अनेक छोट्या मोठ्या कलाकारांच्या भूमिका होत्या. या सगळ्या आठवणींना प्रभुतरुणच्या वर्धापन दिनी पुन्हा एकदा उजाळा मिळाला. आणि प्रभुतरुणाशी असलेलं जुनं नातं नव्याने जाणवलं. म्हणून हा पत्रप्रपंच!

आज प्रभुतरुणच्या कक्षा खूपच रुंदावल्या आहेत आणि त्यात तरुणाईचा सहभाग कौतुकास्पद आहे. प्रभुतरुण नावाप्रमाणेच तरुण राहिला आहे, याचं गमक हेच आहे की आज नव्या पिढीचा सहभाग लक्षणीय आहे. त्यामुळे पुढील काळात तरुणचे भविष्य नक्कीच उज्ज्वल आहे.

प्रभु तरुणाला वर्धापन दिनानिमित्त खूपखूप शुभेच्छा! आणि प्रभुतरुण सदैव असाच तरुण राहो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!

आ.
**स्वाती प्रवीण राणे**

*

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०१४ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२ वा रस्ता खार (प.) येथे संगीत व नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

संगीत स्पर्धा - विषय लावणी (मराठी) महिलांसाठी

प्रथम क्रमांक - सौ. रॉनिका सचिन विजयकर

द्वितीय क्रमांक - श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे

तृतीय क्रमांक - सौ. रजनी नितीन कोठारे

नृत्यस्पर्धा - विषय रेकॉर्ड डान्स वय ५ ते ९ वर्ण (मुले) कुमार आदिल जितेष तळपदे हा एकच स्पर्धक असल्यामुळे त्याला समाजाचे बक्षिस देण्यात आले.

महिलांसाठी वय २६ ते ४०

डॉ. अपूर्वा हर्षद विजयकर त्यांना उत्कृष्ट नृत्याविष्कार व नृत्य दिग्दर्शकाचे पारितोषिक कु. आश्ना मिलिंद जयकर पुरस्कृत ट्रॉफी देण्यात आली.

संगीत स्पर्धेचे परीक्षण सौ. उषा देशपांडे व नृत्य स्पर्धेचे परीक्षण कु. योगिनी वैद्य ह्यांनी केले.

*

## दिलगिरी

दिवाळी अंकातील मुद्रणचुकांबद्दल आम्ही दिलगीर आहोत

-संपादक

लेखांक-९

# केल्याने देशाटन

— हेमलता केशव कोठारे

मी पाहिलेला तिसरा देश म्हणजे अमेरिका. ही जगातील महासत्ता होय. जगातील अनेक देशातील वेगवेगळ्या धर्माचे, जातीचे, व बहुभाषिक लोक एकत्र येऊन सन १७७६ ला स्वातंत्र्य मिळून युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका (United States of America) स्थापित झाली. अमेरिकेत एकूण ५२ राज्यांचा समावेश आहे. अमेरिकेत निरनिराळ्या राज्यात वेगवेगळे हवामान असते. सगळीकडे हिम वर्षाव होत नाही. मी पाहिलेल्या ठिकाणांचे क्रमवार वर्णन देत आहे. सर्वप्रथम मी न्यूयॉर्क शहर बघीतले. न्यूयॉर्क शहर मॅनहॅटन बेटावर वसले आहे. न्यूयॉर्क हे स्वतंत्र राज्य आहे. जगातील अर्थकारणाची उलथापालथ जेथे घडते त्या महासत्तेचे प्रमुख केंद्र म्हणजे 'न्यूयॉर्क स्टॉक मार्केट' ही इमारत बाहेरून बघितली. ह्याच इमारतीजवळ स्टॉक मार्केटचा प्रसिद्ध भव्य बुल बघीतला. तो तांब्याचा असून त्याचे वजन ७ टन आहे. तेथे मजा म्हणून फोटो काढले. न्यूयॉर्क म्हणजे झगमगणारी माया नगरी. येथे चार दिवसांचे वास्तव्य होते. परंतु सध्या ही महासत्ता थोडी डळमळीत झाली आहे. न्यूयॉर्क म्हणजे उत्तुंग भव्य इमारती. प्रत्येक इमारत ही दुसरीबरोबर स्पर्धा करते असा भास होतो. जगातील वेगवेगळ्या देशातील मोठ-मोठे इंजिनियर्स व आर्किटेक्ट ह्यांच्या देखरेखीखाली ह्या उत्तुंग इमारती बांधण्यात आल्या. उदा. युनायटेड नेशन्स बिल्डिंग, न्यू एम्पायर बिल्डिंग, टाईम स्क्वेअर हा येथील प्रसिद्ध स्क्वेअर. येथे बऱ्याच सिनेमांची शुटिंग चालतात. ह्यात आपल्या भारतीय सिनेमांचाही समावेश आहे. निरनिराळे म्युझियम्स, भव्य मोठे पार्क, त्यात सेंट्रल पार्क प्रसिद्ध आहे. येथे ज्युलिया स्कूलची इमारत बघीतली. जगातील निरनिराळ्या देशातील लोक येथे म्युझिकचे प्रशिक्षण घेण्यास येतात. ही जगमान्य प्रसिद्ध संस्था आहे. येथे डोनाल्ड ट्रम्फची ''ट्रम्फ प्लाझा'' ही भव्य इमारत आहे. अशीच ट्रम्फ प्लाझा इमारत शिकागोमध्येसुद्धा आहे. हा 'डोनाल्ड ट्रम्फ' जगातील एक मोठा फायनान्सर म्हणून ओळखला जातो. मला खात्री नाही परंतु माहितीनुसार, मुंबईतील चॅरीटीजचा मोठ्या (चौपाटीवाल्या) प्रोजेक्टचा फायनान्सर डोनाल्ड ट्रम्फ आहे. चुकीची माहिती असल्यास क्षमस्व. न्यूयॉर्कला समुद्रातील प्रसिद्ध ब्रुकलीन ब्रीज बांधण्यात आला आहे. ह्या ब्रुकलीन ब्रीजवरून प्रवास केला. प्रसिद्ध स्वातंत्र्य देवतेचे (स्टॅच्यु ऑफ लिबर्टी) स्मारक बघायला जाताना प्रथम फेरी बोट एलिस बेटावर नेतात. एलिस बेटाचे महत्त्व म्हणजे जगातील वेगवेगळ्या देशातून अमेरिकेत आलेले लोक प्रथम एलिस बेटावर उतरत. म्हणजे हे पूर्वी अमेरिकेचे प्रवेशद्वारच होते. येथे 'इमिग्रेशन म्युझियम' बांधण्यात आला आहे. त्यात १६०० सालापासून २०१० पर्यंत, अमेरिकेत कोणत्या देशातून किती लोक आले ह्याविषयीची आकडेवारी दाखविली आहे.

## सोशल समाजाची 'कोजागिरी सहल'

गेल्या काही वर्षात सोशल समाजाने आपली जुनी परंपरा जपत, तर काही कालबाह्य कल्पनांच्या जागी नवनवीन कल्पना साकारत आपली घोडदौड जोमाने सुरू ठेवली आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर वर्षासहल, कनकाई देवी उत्सवात सहभाग, फोटो मेनिया आणि आता यावर्षी कोजागिरीनिमित्त उघड्या डेकच्या बसमधून चांदण्यातली सहल! फोटोमेनियासंबंधी प्रभुतरुण-मध्ये वृत्तांत देताना असं म्हटलं होतं की, ''सोशल समाज आता कात टाकत आहे.'' आणि खरंच आहे. यावर्षी सोशल समाजाने रविवार दि. ५ ऑक्टोबर २०१४ रोजी समाजाच्या सभासदांसाठी खास 'कोजागिरी सहल' आयोजित केली होती. सहलीसंबंधी मौखिक घोषणा वार्षिक सभेत करण्यात आल्यावर केवळ आठवडाभरात सगळी बस हाऊसफुल्ल झाली.

सी-लिंक वरून बस वरळीच्या दिशेने धावू लागली आणि वरच्या डेकवरची मंडळी चांदण्यांच्या वर्षावात उजळलेल्या मुंबईची आकाश रेषा (Skyline) निरखण्यात दंग झाली तर खालच्या डेकवरची मंडळी अंताक्षरीच्या धुंदीत रंगून गेली होती. बस मरीन ड्राईव्हवरून ऑबेरॉय हॉटेल व नरीमन पॉईंटला कधी पोहोचली ते कळलंच नाही. तेथून गेटवे ऑफ इंडियाच्या दिशेने वळून रिगल सिनेमाला वळसा घालून बस पुन्हा एनसीपीएला आली आणि मरीन ड्राईव्हवर भोजनासाठी विसावली. मंडळींना बिर्याणीची पाकिटे, वॉटर बॉटल आणि चॉकलेट आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. मंडळींनी सागराच्या साक्षीने मरीनड्राईव्हवर भोजनाचा आस्वाद घेतला आणि मग वरच्या खालच्या डेकची अदलाबदल करून बस परतीच्या प्रवासाला लागली.

एखाद्या शाळेच्या ट्रीपला असतो तसा उत्साह या सहलीत अनुभवायला मिळाला आणि आपली ज्ञात धनानेच नाही तर मनाने देखील श्रीमंत आहे व तितकीच तरुणही आहे, याचे प्रत्यंतर आले. सहलीचे आयोजन समाजाचे चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर, सौ नीता सेंजित, श्री. निकोलाय कीर्तिकर, सौ. बिंबा नायक यांनी उत्तम प्रकारे केले होते. मंडळी उत्साहाचं आणि उमेदीचं 'चांदणं' बरोबर घेऊनच आपल्या घरी परतली.

## पाठारे प्रभु महिला समाज

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०१४ रोजी प्रभु सेमिनरी सभागृह, ठाकुरद्वार येथे दुपारी ४ वाजता निबंध स्पर्धा व काव्यस्पर्धा घेण्यात आल्या. (निबंध व काव्य घरून लिहून आणणे)

निबंध स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे.

**विषय - नाती**

प्रथम क्रमांक- कु. शलाका निलेश विजयकर, द्वितीय क्रमांक-श्रीमती हेमा रामचंद्र जयकर, तृतीय क्रमांक विभागून - सौ. सुजाता रामनाथ कोठारे, श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर.

**काव्यस्पर्धा विषय-आनंदगीत**

प्रथम क्रमांक : सौ. स्नेहा नंदकुमार कोठारे, द्वितीय क्रमांक : श्रीमती हेमा रामचंद्र जयकर, तृतीय क्रमांक : सौ. सुजाता रामनाथ कोठारे

निबंधस्पर्धेचे परीक्षण श्री. सुहास लिमये व काव्यस्पर्धेचे परीक्षण सौ. अपर्णा बेडेकर ह्यांनी केले.

## प्रभुप्रभात

प्रभुप्रभाततर्फे १२ ऑक्टोबर २०१४ रोजी खारच्या सभागृहात विवाहोत्सुक वधूवर पाठारे प्रभुंचा मेळावा आयोजित करण्यात आला. यात चाळीस जणांचा सहभाग होता. या उपक्रमाबद्दल अभिनंदन.

## कनकाई देवी उत्सवात सोशल समाजाचा सहभाग

पार्ल्याच्या राजपुरीया हॉलमध्ये नवरात्रात साजऱ्या होणाऱ्या कनकाई देवीच्या उत्सवात गेल्या वर्षीपासून सोशल सामाजातर्फे एक दिवस कार्यक्रम सादर होतो. गतवर्षी सोशल समाजाने संगीताच्या माध्यमातून कनकाईदेवीची आराधना केली तर यंदा दि. ३० सप्टेंबर २०१४ रोजी समाजातर्फे सादर झालेल्या कार्यक्रमात रसिकांना संगीताबरोबर नृत्याचीही मेजवानी मिळाली. नृत्याची जबाबदारी सौ. मयुरा नायक यांनी समर्थपणे पेलली आणि आपल्या १२ सहकालाकारांसह त्यांनी ३ नृत्ये वेषभूषेसह आकर्षक रंगसंगतीत बहारदारपणे सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. गणेशवंदना, दुर्गेची आरती आणि सौ. मयुरा नायक यांचे सोलो राधानृत्य अतिशय नयनरम्य होते. संगीतामध्ये सौ. सुहास विजयकर, सौ. वीणा अजिंक्य, सौ. रॉनिका विजयकर, सौ. अक्षदा तळपदे, सौ. रजनी कोठारे, सौ. स्नेहा राणे व सौ. योगिता नवलकर यांनी गाणी सादर केली. त्यांना साथसंगत केली संवादिनीवर श्री. चंद्रकांत सुतार व श्री. सुजय गवांदे यांनी आणि तबल्याची साथ होती श्री. प्रदीप राणे व श्री. अवधूत चौबळ यांची! सूत्रसंचालन समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी समर्पकपणे सादर केले. सगळ्यात बहार आली ती शेवटच्या ''भोंडला'' नृत्याने! हल्लीच्या पिढीला ''भोंडला'' हे नावही माहीत नाही. मंगळागौरीच्या खेळांसारखी या भोंडल्याची गीते व नृत्ये पारंपारिक असतात. ही गीते सौ. रजनी कोठारे यांनी उपलब्ध करून दिली आणि सौ. अक्षदा तळपदेसह सादरही केली. प्रेक्षकांमध्ये मरांठी प्रेक्षकांबरोबर गुजराथी समाजही मोठ्या संख्येने हजर होता. त्यांना हा प्रकार अतिशय भावला. सौ. पल्लवी कोठारे (सून) श्रीमती स्वाती राणे (सासू) सौ. रॉनिका विजयकर (पत्नी) सौ. स्नेहा राणे (सासरेबुवा) व सौ. नीता सेंजित (दीर) यांच्या अभिनयाने कार्यक्रमात बहार आणली. शेवटी सोशल समाजातर्फे खिरापत म्हणून पेढ्यांचा प्रसाद सर्व उपस्थितांना देण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन कनकाई देवी ट्रस्टचे सभासद असलेल्या श्री. तुषार किर्तिकर, श्री. उमेशचंद्र कीर्तिकर, व श्री अमोघ कीर्तिकर यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी समाजाच्या विश्वस्त श्रीमती प्रमिला तळपदे यांनी रु. २०००/- ची देणगी दिली. तर सर्व कलाकारांना अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांच्याकडून तसेच श्री. तुषार कीर्तिकर व कनकाई ट्रस्ट यांच्याकडूनही भेटवस्तू देण्यात आल्या. सर्व उपस्थितांना महाप्रसाद म्हणून भोजन देण्यात आले. या वर्षी एक तास सादर झालेल्या या कार्यक्रमाच्या यशामुळे पुढील वर्षापासून २ तास समाजाच्या कार्यक्रमासाठी देण्याचा निर्णय कनकाई ट्रस्टतर्फे घेण्यात आल्याचे घोषित करण्यात आले. यातच कार्यक्रमाचे यश सामावले आहे.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिभा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✳ कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मरणार्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकरकडून आश्रयदाते या नात्याने रु. ११,०००/-

✳ कै. श्रीमती प्रतिभा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मरणार्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकरकडून आश्रयदाते या नात्याने रु. ११,०००/-

✳ श्री. उदय शंकर मानकर यांजकडून प्रभुतरुण दिवाळी अंकाकरिता रु. १००१/-

✳ श्री. सुनील जयकर यांच्याकडून दिवाळीनिमित्त रु. १००१/-

✳ कस्तुर रवींद्र तळपदे यांजकडून प्रभुतरुणास रु. १००१/-

✳ श्रीमती सुमती शामराव त्रिलोकेकर यांच्या १०१व्या वर्षातील पदार्पणानिमित्त (१-११-१४) त्यांच्या हितचिंतकाकडून रु. १००१/-

✳ श्रीमती सविता श्रीकिशन धराधर स्मरणार्थ नातू रिद्धीश शैलेश धराधरकडून रु. ५०१/-

✳ श्रीमती सरिता (मीनाक्षी) नाथकुमार धराधर स्मरणार्थ नातू सिद्धार्थ शैलेश धराधरकडून रु. ५०१/-

✳ श्री. मनिष सुरेश कीर्तिकरकडून त्यांची कन्या कु. शिवानी हिच्या बारावी (कॉमर्स) मधील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु. ५००/-

✳ सुप्रिया कीर्तिकरकडून प्रभुतरुणास दिवाळी भेट रु. ५००/-

✳ श्री. कमलाकांत विश्वनाथ अजिंक्य यांजकडून त्यांच्या पत्नी सौ. शुभांगी कमलाकांत अजिंक्य यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त रु. १०२/-

✳ श्री. विठोबा ग. नायक यांजकडून त्यांची नात कु. निशीता निलेश नायक हिच्या आर्किटेक्चर या परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु. १०१/-

**प्रभुतरुण भाऊबीज**

श्रीमती मोरेश्वर प्रधान रु. ५००/-
सौ. सुमन सुवर्णकुमार नवलकर रु. २५१/-
सौ. उर्मिला उदय जयकर रु. २५०/-
सौ. कल्पना सुभाष कोठारे रु. २५०/-
सौ. सीमा सुधीर धैर्यवान रु. २००/-
सौ. सुरेखा प्रदीप कोठारे रु. १००/-
श्रीम. प्रमिला मधुकर तळपदे रु. १००/-

**प्रभुतरुण वर्धापनदिनानिमित्त देणग्या**

✳ सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकरकडून रु. ५०००/-

✳ श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून रु. २०००/-

✳ सौ. नीलन आणि श्री. दीपक मा. धैर्यवानकडून रु. १००१/-

✳ तेजस्वीनी अजित मानकरकडून रु. १००१/-

✳ श्री. अजित मुकुंदराव मानकरकडून रु. १००१/-

✳ सौ. आणि श्री. हेमचंद्र ग. प्रधानकडून रु. १००१/-

✳ श्री. प्रताप मोतीराम वेलकरकडून रु. १००१/-

✳ कु. ऐश्वर्या अमर अजिंक्यकडून रु. १०००/-

✳ सौ. उर्मिला आणि श्री. उदय बाळाराम जयकरकडून रु. १०००/-

✳ सौ. आणि श्री. प्रकाश बाळाजी नायककडून रु. १०००/-

✳ इशान आणि कु. निष्का दीपक कोठारेकडून रु. ५०१/-

✳ श्री. नीलेश ग. प्रधानकडून रु. ५०१/-

✳ सौ. सुरेखा आणि श्री. प्रदीप कोठारे कडून रु. ५००/-

✳ सौ. अनुराधा आणि डॉ. श्री. विनोद धुरंधरकडून रु. ५००/-

✳ सौ. वृंदा आणि श्याम जयकरकडून रु. ५००/-

✳ श्रीमती सुबोध गणपतराव प्रधानकडून त्यांचे बंधु कै. श्री. सुरेश ग. प्रधान यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रु. ३००/-

✳ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद ग. प्रधानकडून रु. २५०/-

सर्व देणगीदारांचे आभार.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| १७-१०-१४ | सौ. ग्लॅनिस आणि श्री. राजदीप राजेंद्र तळपदे, कन्या, सिडनी (ऑस्ट्रेलिया) | | |
| | सौ. कश्मिरा आणि श्री. स्वप्नील अरविंद व्यवहारकर, पुत्र, हेलसिंकी | | |

### नारळसाखर दिला

| | |
|---|---|
| १९-१०-१४ | श्री. सिद्धार्थ सुधीर धैर्यवान, कु. विनी हेमंत तळपदे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०९-१०-१४ | श्री. प्रदीप केशव कोठारे | वय ६०, | बोरीवली |
| १४-१०-१४ | श्रीमती उषा गुरुनाथ धैर्यवान | वय ८७ | खार |
| १५-१०-१४ | सौ. पल्लवी प्रदीप केशव तळपदे | वय ६० | मुलुंड |
| २५-१०-१४ | श्री. समित (सुमेध) रसिक विजयकर | वय ४२ | गोराई (बोरीवली) |
| २७-१०-१४ | डॉ. गजानन वामनराव विजयकर | वय ९१ | वांद्रे |
| २१-१०-१४ | श्री. भालचंद्र गोविंदराव धुरंधर | वय ७० | गोरेगाव |

## अभिनंदन

✳ श्री. स्वप्नील जयकर यांना 'तेंडुलकर आऊट' चित्रपटाच्या निर्मिती आणि दिग्दर्शनाबद्दल दोन पारितोषिके प्राप्त झाली. अभिनंदन.

✳ श्री. सुजन राणे यांचा लेख 'वसंत' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला.

✳ श्री. विश्वास अजिंक्य यांचा 'मोगलाई आणि बिरयाणी' लेख लोकसत्ताच्या पुरवणीत प्रसिद्ध झाला.

✳

## परीक्षतील सुयश

**बारावी (कॉमर्स)**

कु. शिवानी मनीष कीर्तिकर
७९.०८ टक्के

**आर्किटेक्चर**

कु. निशीता नीलेश नायक या इंटिरियर डिझायनिंग आर्किटेक्चर या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम आणि मुंबई विद्यापीठातून दुसऱ्या क्रमांकाने यशस्वी झाल्या. अभिनंदन.

## भावांजली

डॉ. गजानन वामनराव विजयकर हे ज्ञातीतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्तिमत्व. चॅरिटिजचे विश्वस्त या नात्याने गेली कित्येक वर्षे ते वैद्यकीय शिबीर आयोजित करीत होते. उत्तम संस्कार, उच्च शिक्षण आणि ज्ञातीप्रेम यामुळे त्यांचे कार्य अनमोल ठरले. प्रभुतरुणावर त्यांचे ममत्व होते. ज्ञातीतील हे अनमोल रत्न आता हरपले. त्यांना आमची कृतज्ञ भावांजली.

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**

मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४००००८

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर

RNI NO. 14613/67